अ - २ - पा - २
५३०४/५०९

मौजे- पेठ अमरावती, दर प्रति चौ.मी. रु.१०,२७५/-

विभाग क्रं.८.२४०

एकूण ई-चलान मुद्रांक शुल्क रू. = ४,२०,०००/-

स्थावर मालाचे खरेदी खत

बाजार भावाने व प्रत्यक्ष सौदा किंमत रू. - ७०,००,०००/-

(अक्षरी सत्तर लाख रू. फक्त)

(शासनाच्या नियमानुसार मुद्रांक शुल्क लावलेला आहे.)

लिहून घेणार : आगरकर बिल्डर्स अँड डेव्हलपर्स अमरावती तर्फे
प्रोप्रा. (पॅन ए.बी.के.एफ.ए. २७६० एन)

१) प्रल्हादराव यशवंतराव आगरकर
वय - ५७ वर्षे, धंदा - व्यापार

२) सविता प्रल्हादराव आगरकर
वय - ५२ वर्षे, धंदा - व्यापार

३) पवन प्रल्हादराव आगरकर
वय - २६ वर्षे, धंदा - व्यापार

४) शुभम प्रल्हादराव आगरकर
वय - २३ वर्षे, धंदा - व्यापार

सर्व रा. नेमाणी गोडाऊन, पारीजात कॉलनी, बडनेरा रोड साई नगर, अमरावती-४४४६०७ यांसी,

लिहून देणार : अरूण शांताराम खांडे
(पॅन ए.बी.ए.पी.पी. ९८२४ सी)
वय - ७२ वर्षे, धंदा - सेवानिवृत्त
रा. सुधाकर सह निवास १४४, शिवाजी नगर
नागपूर-४४००१०,
सदस्य-शितल को-ऑप. हाऊसिंग सोसायटी,
अमरावती

The Seal of the Joint Sub-Registrar Class-2 Amravati City-2 District Amravati

अ - २ - ११५२
पुअक्रं ६७१
२०१७ -२-

इ.सन. २०१७ साल कारणे मी स्थावर मालाचे खरेदी खत लिहून देतो कि, सदरहू खरेदीखताचा संपूर्ण भरणा खालील प्रमाणे मिळाला.

रू.१०,००,०००/- (अक्षरी दहा लाख रू.फक्त) आर.टी.जी.एस द्वारे दि.४.८.२०१७ रोजीचा बँक ऑफ इंडिया शाखा अमरावती या बँकेतुन माझे खात्यात ट्रान्सफर झाले त्यावरून ते मला मिळाले.

रू.७०,०००/- (अक्षरी सत्तर हजार रू.फक्त) टी.डी.एस. म्हणून ॲक्सीस बँक लि येथे भरले आहे.

रू.५०,००,०००/- (अक्षरी पन्नास लाख रू.फक्त) आर.टी.जी.एस द्वारे दि.२२.१२.२०१७, रोजीचा बुलढाणा अर्बन को-ऑप बँक लि. शाखा अमरावती या बँकेतुन माझे खात्यात ट्रान्सफर झाले त्यावरून ते मला मिळाले.

रू.९,२०,०००/- (अक्षरी नऊ लाख वीस हजार रू.फक्त) आर.टी.जी.एस नं. बी.के.आय.डी.एच.१७३५६९१६५२६, दि.२२.१२.२०१७, रोजीचा बँक ऑफ इंडिया शाखा अमरावती या बँकेतुन माझे खात्यात ट्रान्सफर झाले त्यावरून ते मला मिळाले.

रू.१०,०००/- (अक्षरी दहा हजार रू.फक्त) आजरोजी रोख नगदी घरी आगावू मिळाले.

असा खरेदीखताचा संपूर्ण भरणा **रू. ७०,००,०००/-(अक्षरी सत्तर लाख रू. फक्त)** चा मला तुमचेकडून वरीलप्रमाणे मिळाला. भरण्याबाबत माझी काही तक्रार राहिली नाही. या रूपयाच्या मोबदल्यात मी दि. १३.७.२०११ रोजीचे हस्तांतरण दस्त अनु क्रं. ३४२१ नुसार खरेदी केलेला व तेव्हांपासुन माझ्याच एकमेव मालकी व ताब्यातील खालील वर्णनाचा खुला प्लॉट तुम्हांस आज रोजी अक्षयी करीता खरेदी करून देतो आहे त्या प्लॉटचे वर्णन:-



अ - २ - ५३०४/२०१९
२०१७

नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर वि. कचेरीचे कक्षेतील व अमरावती मनपा च्या हद्दीतील मौजे- **पेठ अमरावती,** प्रगणे - **बडनेरा** , ता.जि. अमरावती येथील शेत सर्वे नं.५१/१-**अ,** मधील जमीनीतील रे.के.नं. एन.ए.पी.-३४/पेठ अमरावती-३/१९७३-७४, नि.ता. २२.२.१९७४ नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजुर झालेला **खुला प्लॉट क्रं. २८ (अठ्ठावीस)** याची साईज मंजुर नकाशानुसार असून याचे एकूण क्षेत्रफळ **३१३.५५ चौ. मी (३३७५ चौ.फुट)** आहे.याची चर्तु:सिमा:-

पुर्वेस	:	सर्विस लाईन
पश्चिमेस	:	लेआऊट मधील रोड
उत्तरेस	:	प्लॉट नं.२९
दक्षिणेस	:	लेआऊट मधील रोड

येणे प्रमाणे वर वर्णन केलेल्या चर्तु:सिमेच्या आतील खुला प्लॉट मी तुम्हांस आजरोजी प्रत्यक्ष मोजमाप करून तुमचे ताब्यात दिला आहे. त्याचे तुम्ही आजपासून परिपुर्ण मालक झाले असून मालकी हक्काने याचा वंशपरंपरा उपभोग घ्यावा व मर्जिनुसार विल्हेवाट करावी.

सदरहू खुला प्लॉट मी यापुर्वी अन्य दुसरे कोणास कोणत्याही लेखाने लिहून दिलेला नाही. तसेच यावर सरकारी सावकारी कर्ज गहाण बोजा, ताबा, हक्क, कुळ, वारसा वगैरेची काही भानगड नाही तसे काही निघाल्यास किंवा तुमचे मालकी हक्कास व भोगवटयास बांधा आल्यास त्यास मी जबाबदार राहील. तुम्हास तोषीस खर्च लागु देणार नाही.

आज पर्यंत चा लागणारा अकृषक कर मी भरला असून यापुढे तो तुम्ही भरत जावा. रोड नाल्या बांधण्याची व डेव्हलपमेंट चार्ज लागल्यास तो भरण्याची संपूर्ण जबाबदारी तुमची राहील.तसेच लेआऊट कन्व्हर्शन केस मधीलशासनाने टाकलेल्या अटी व नियमांचे पालन करण्याची जबाबदारी तुमचेवर राहील.

सदरहू खुला प्लॉट ची नोंद रे.ऑ. रा. मध्ये तुम्ही तुमचे नावाने परभारे करून घ्यावी त्यास माझी मुळीच हरकत राहणार नाही. लागल्यास मी कबुली जवाब देईल उजर करणार नाही.

सदर्हू प्लॉट मी ज्या खरेदी हक्काने खरेदी केला होता त्या खरेदी हक्काने तुम्हांस आजरोजी खरेदी करून दिला आहे.

हे खरेदीखत मी माझ्या राजीखुशीने सावध असतांना वाचून समजुन व दोन साक्षीदारां समक्ष सही करून लिहून दिले. ते मला व माझे इस्टेट वारसांस नेहमीकरीता लागु व बंधनकारक असे.अमरावती आज दिनांक: २२.१२.२०१७,

फोटो अंगठा सही, लिहून देणार





(अरूण शांताराम पांडे)

सहया, लिहून घेणार

आगरकर बिल्डर्स अँड डेव्हलपर्स अमरावती तर्फे प्रोप्रा.





१.

(प्रल्हादराव यशवंतराव आगरकर)






२.

(सविता प्रल्हादराव आगरकर)





३.

(पवन प्रल्हादराव आगरकर)





४.

(शुभम प्रल्हादराव आगरकर)



२)

